जिल्हा परिषद अहमदनगर, शिक्षण विभाग (प्राथमिक)
दुरध्वनी क्रमांक - ०२४१-२३५३६९४
ई मेल आयडी - ednprimary@gmail.com
पत्ता- नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर पिन कोड - ४१४००१

जा.क्र.प्राथ. शिक्षण/कार्या -४/स्वयं अ शा/328/२०२३ दि. /०४/२०२३ 25/5/23

**प्रथम मान्यता :-**

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
संजीवनी ग्रामिण शिक्षण संस्था शिंगणापुर ता.कोपरगाव जि.अहमदनगर.

**विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयं-अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणेसाठी २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देऊन कार्योत्तर प्रथममान्यता देणेबाबत.**

**संदर्भ** :- १.महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२ यांचेकडील नाहरकत पत्र क्र.एनओसी-४०२१/सीआर.१३८/एसएम-३ दिनांक ०९/०९/२०२१

२. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२ यांचेकडील नाहरकत पत्र क्र.एनओसी-२०१३/१९१/१३/एमएएसएचआय१ दिनांक २४/०६/२०१३

३.गट शिक्षणाकारी,पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील संजीवनी ग्रामिण शिक्षण संस्था शिंगणापुर ता.कोपरगाव संचलित संजीवनी ॲकेडमी स्कुल कोपरगाव जि.अहमदनगर या शाळेचा प्रथम मान्यता प्रस्ताव दिनांक २७/०४/२०२३

४ संजीवनी ग्रामिण शिक्षण संस्था शिंगणापुर ता.कोपरगाव संचलित संजीवनी ॲकेडमी स्कुल कोपरगाव या शाळेचा प्रथम मान्यता प्रस्ताव क्र.१५६/२०२२-२३ दिनांक १३/०४/२०२३

५. गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती कोपरगाव यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल दिनांक २७/०४/२०२३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्षे २०२३-२४ मध्ये शाळेचा प्रथम मान्यतेकरीता प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र-१,व २ नुसार खालील अटी शर्तीची पुर्तता करणेचे अटीवर सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून कार्योत्तर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ष / इयत्ता | मान्यता वर्ष प्रथम मान्यता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | अहमदनगर | संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्था शिंगणापुर ता.कोपरगाव | संजीवनी ॲकेडमी स्कुल कोपरगाव | इंग्रजी | प्रथम मान्यता १ ली ते ८ वी | २०१२ - १३ ई.१ली ते ८वी | २०२२-२३ |

**अटी व शर्ती:-**

१) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९, या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात बदल करता येणार नाही.

२) पात्र ठरलेल्या संबंधीत शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम २००९,मधील तरतूदींची पूर्तता करुन सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात परवानगी देण्यात येत आहे.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) ज्या व्यवस्थपनास सन २०१२-१३ शाळा स्थापन करण्यासाठी शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णय दिनांकापासून परवानगी मिळालेपासुन १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द ठरेल.

४) सी बी एस ई,आय सी एस ई,आय बी, आय जी एस ई व सी आय ई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यसक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास/शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रथम मान्यतेनंतर सदर शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतर शासन मंडळ संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देईल.

५) दर्जावाढ परवानगी दिलेल्या शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालु करता येणार नाहीत

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाया आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) शाळेने अधिनियम २००९ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) यु डायस डाटा - शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणुन स्वतंत्र

१०) नोंद करणे संबंधीत संस्थेवर आवश्यक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यायाठी राज्य प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांना नोडल अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

११) महाराष्ट्र शासन बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोटनियम (४) नुसार मानके पुर्ण करणे आवश्यक आहे.

१२) शासनाचे सध्या अस्थित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

१३) शासन निर्णय दिनांक १३ डिसें २०१३ व २८/८/२०१५ नुसार संच निश्चिती करुन घेणे आवश्यक आहे.

१४) प्रचलित नियम व निकषानुसार शिक्षक नियुक्ती करावी/टीईटी पात्र शिक्षकांची नियुक्तीसाठी योग्य ती कार्यवाही करावी.

१५) संस्था व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी प्राथ जि.प. अहमदनगर संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षे कालावधीसाठी मुदतठेव ठेवणे आवश्यक आहे.

(भास्कर पाटील)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

प्रत- माहिती स्तव -

१)मा.शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग, पुणे-१

२)मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनाय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१

३)मा.शिक्षण संचालक,प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

४)गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव.